POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक -२४२ ● मुंबई, शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## उद्धव ठाकरेंनी २०१९ पेक्षा मोठा अपराध काल केला

# UT म्हणजे युज अँड थ्रो, शिंदेंचा हल्लाबोल!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

लोकसभेत रात्री उशिरा वक्फ बोर्ड विधेयक संमत झाल्यानंतर आता राज्यसभेत विधेयकावर चर्चा सुरू आहे. मात्र, या विधेयकास काँग्रेससह शिवसेना उबाठा पक्षानेही विरोध केला आहे. शिवसेना उबाठा पक्षाच्या खासदारांनी या विधेयकाविरोधात मतदान केल्याने भाजपने उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरेंनी देखील पत्रकार परिषद घेऊन भाजपचा खरा चेहरा उघडा पडल्याचे म्हटले. आता, शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी २०१९ मध्ये विचारधारा सोडून अपराध केला होता. मात्र, त्यापेक्षा मोठा अपराध त्यांनी काल लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध करुन केला, अशी घणाघाती टीका एकनाथ शिंदे यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन मांडलेल्या भूमिकेवर शिंदेंनी हल्लाबोल केला. जी भाषा टक्ट खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी वापरली, तीच भाषा उद्धव ठाकरे यांची होती, असा टोलाही शिंदेंनी लगावला.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, उबाठाने हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार सोडले यावर काल शिक्कामोर्तब झालं आहे. वक्फ बोर्ड विधेयकाला केलेला विरोध, बाळासाहेबांचे विचार अजून हीआहेत असं म्हणणाऱ्यांची मान शरमेनं खाली गेलीय. उबाठासाठी कालचा दिवस दुर्दैवी होता. वक्फ बोर्ड विधेयकास विरोध करायचा आणि हिंदुत्वाला विरोध नाही म्हणायचं , भाजपच्या ढोंगीपणाला विरोध म्हणायचं. मात्र, त्यांचीच गोंधळलेली परिस्थिती पाहायला मिळाली. पण, शिवसेनेची आणि भाजपची आजची भूमिका तीच आहे. बाळासाहेब म्हणायचे, देशभक्त मुस्लिमांना आपला पाठिंबा आहे, देशविरोधकांना नाही, हीच भूमिका आम्ही लोकसभेत दाखवल्याचं एकनाथ शिंदेनी म्हटलं.

**अशा लोकांना चाप बसेल**

राहुल गांधीची सावली मिळाल्याने उबाठाला वारंवार पाकिस्तानचे निमार्ते मोहम्मद अली जिनांची आठवण येते हे दुर्दैव आहे. आता, त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. उद्धव ठाकरेंची आजची पत्रकार परिषद स्वतः ची अब्रू काढून घेणायासारखं आहे. काँग्रेसने १२३ जागांची संपत्ती डिनोटिफाय केली आणि जमिनी घशात घातल्या गेल्या. या जमिनी मूठभर लोकांकडे गेल्या. वक्फ सुधारणा विधेयकामुळे अशा मूठभर लोकांना चाप बसेल, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान सहन करणारे, अपमान केला तरी मांडीला मांडी लावून बसत आहेत. विरोधात काँग्रेस बोलेल तेव्हा उबाठा बोलणार नाही, अबु आझमी आणि ओवेसी यांची भाषा ते बोलायला लागले आहेत. त्यामुळे, याची उत्तरं जनता घेतल्याशिवाय राहणार नाही असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.



### एसंशि टीकेवर पलटवार वळ

उद्धव ठाकरे यांनी एकनाथ संभाजी शिंदे यांचा उल्लेख एसंशि असा केला होता. त्यावर एकनाथ शिंदे यांनी पलटवर केला. मला एसंशि म्हणाले मग मी त्यांना युटी म्हणू का? युज अँड थ्रो? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी केला. मला काम करु द्या, मी शांत आहे तोवर शांत आहे, जास्त बोलायला लावू नका, माज्याकडे बोलण्यासारखे खूप आहे. मला गद्दार गद्दार बोलले, खोके खोके बोलले. पण २०१९ च्या निवडणुकीत तुम्हाला लोकांनी खोक्यात बंद केलंय. त्यांची भूमिका दुटप्पी भूमिका आहे. यांची घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे. काल जे त्यांनी केलं ते मोठा अपराध होता, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

## वक्फ विधेयकावरून शिंदेंनी उद्धव ठाकरेंना डिवचलं!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन वक्फ दुरुस्ती विधेयकावरून मोदी सरकारवर टीका केली. आमचा विरोध भाजपाच्या ढोंगीपणाला आहे. वक्फ विधेयक आणि हिंदुत्त्वाचा संबंध नाही, असे स्पष्टीकरण ठाकरे यांनी दिले. त्यांच्या याच भूमिकेवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. नेतृत्त्वची भूमिका ठोस नसली तर त्या पक्षाचा इतिहास संपतो. राहुल गांधी यांच्यासोबत राहिल्यामुळे त्यांना सतत जिना यांची आठवण येते, असा टोलाही त्यांनी लगावला. ते मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देत होते.

कालचा दिवस (२ एप्रिल) खऱ्या अर्थाने उबाठासाठी दुर्दैवी होता. ते म्हणतात की वक्फ बोर्ड विधेयक आणि हिंदुत्त्वाचा काहीही संबंध नाही. आमचा वक्फ बिलाला विरोध नसून आमचा भाजपाच्या ढोंगीपणाला विरोध आहे, असं ते म्हणत आहेत. ते अतिशय गोंधळलेल्या स्थितीत आहेत. काय बोलायचं काय निर्णय घ्यायचा, हे उबाठा नेतृत्तावा सुचत नाहीये. बाळासाहेब ठाकरे यांचा देशभक्त मुसलमानांना पाठिंबा होता. हीच भूमिका आमची आणि भाजपाची आहे. सारखं आणि सातत्याने राहुल गांधी यांची सावली मिळाल्यामुळे, राहुल गांधी यांच्यासोबत राहिल्यामुळे उबाठाला जिना यांची आठवण येते. हे दुर्दैव आहे. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना काय करायचं ते समजत नाही. निर्णय काय घ्यायचे हेही समजत नाही, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केलीय.

काही मुठभर लोकांच्या हातात लाखो, करोडो एकर जमीन होती. वक्फ सुधारणा विधेयकामुळे याला चाप बसणार आहे. काँग्रेसच्या काळात 123 जागा काही लोकांच्या घशात घातल्या गेल्या. आता असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. मोदी यांच्या निर्णयामुळे मुठभर लोकांना चाप बसेल. वक्फ बोर्डाच्या जमिनीवर शाळा होतील, कॉलेजेस, रुग्णालये होतील. महिलांना, मुलांना, विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल. त्यामुळेच मुस्लीम लोकांनीही या विधेयकाचे स्वागतच केले आहे, असेही शिंदे म्हणाले.

## ६९ नवजात बालकं असलेल्या कक्षात शॉर्ट सर्किट!

## नाशिक जिल्हा रुग्णालयात धक्कादायक प्रकार



**■नाशिक । प्रतिनिधी :**

नाशिकच्या जिल्हा रुग्णालयातील नवजात कक्षात शॉर्ट सर्किट झाल्याचा प्रकार समोर आलायं. ज्या कक्षात हे शॉर्ट सर्किट झालं तिथे ६९ नवजात बालक होते. सुदैवाने कोणतीही अनुचित घटना घडली नाही. शॉर्ट सर्किट झाल्यानंतर त्वरित सर्व बालकांना दुसऱ्या कक्षात हलवण्यात आले. शॉर्ट सर्किट झाल्याचे लक्षात आल्यानंतर सर्व परिचरिकांनी लगेच बालकांना सुरक्षित दुसऱ्या कक्षात हलवण्यात आले.

## चोरी करून फरार ४ अज्ञात गुन्हेगारांना पोलिसांनी केली अटक

**■पालघर । प्रतिनिधी :**

जबरी चोरी करून पळून गेलेल्या चार अज्ञात आरोपींना जव्हार पोलीस ठाणे यांचेकडून अटक. अधिक माहितीनुसार दिनांक २८.०३.२०२५ रोजी रात्रौ ११.३० वाजताचे सुमारास फिर्यादी भोरू खंडू बिन्नर, वय ३० वर्षे, रा. खोडाळा, ता.मोखाडा, जि. पालघर, मुळ रा. मोडाळे, पो. सांजेगाव, ता. इगतपुरी, जि. नाशिक हे त्यांच्या पिकअप गाडीने जात असताना मौजे वावर गावचे हद्दित ता. जव्हार जि. पालघर येथे तीन अनोळखी इसम यांनी रस्त्यामध्ये मोटार सायकल आडवी उभी करुन 'आमची गाडी बंद पडली आहे, आमची गाडी तुमच्या पिकअप गाडीमध्ये ठेवुन पुढील गावात सोडुन द्या' असे सांगत असताना पिकअप गाडी चालक व फिर्यादी यांचे डोळयामध्ये मिरचीपुड टाकुन पिकअप गाडीमध्ये ड्रायव्हर सिटच्या पाठीमागे असलेली ६,८५,५००/- रुपये रोख रक्कम फिर्यादी यांच्या मानेवर कोयता ठेवुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याचा धाक दाखवुन बळजबरीने हिसकावुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जव्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी श्री. गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/किशोर मानभाव, जव्हार पोलीस ठाणे यांना पोलीस पथक तयार करून तपास करण्याबाबत सुचना दिल्या. त्याअनुषंगाने पोउपनि / संजय भुसाळ, पोउपनि / दिघोळे, पोहवा / प्रदिप विटकर, पोहवा/ गायकवाड, पोहवा / नेहरे, पोना / सचिन भुसारा सर्व नेम. जव्हार पोलीस ठाणे यांचे पथक तयार करण्यात आले. सदर पथकाने घटनास्थळी भेट दिली असता घटनास्थळी मिरची पुड मिळून आली. सदर मिरची पुड ही एका लग्न पत्रीकेत आणली असल्याचे दिसून आले. त्याआधारे तसेच तांत्रीक पध्दतीने तपास करून चार संशयीत आरोपी १) दत्तु खंडू बिन्नर वय ३४ वर्षे, रा. खोडाळा ता. मोखाडा जि. पालघर मुळ रा. मोडाळे, पो. साजेगाव, ता. इगतपुरी, जि. पालघर २) परमेश्वर कमलाकर झोले वय २४ वर्षे रा. धाडोशी, पो. सामुड्डी, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक ३) दादा बाजीराव पेहरे वय २४ वर्षे, रा. भिलमाळ, पो. सामुड्डी, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक, ४) किरण आनंता लामठे, वय २३ वर्षे, रा. भुरीटेक पैकी धांगडयाची वाडी, ता. मोखाडा, जि. पालघर यांचा शिताफिने शोध घेऊन त्यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे कसून चौकशी केली असता आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा भाऊ असून त्याने आरोपी क्र. २ ते ४ यांचे साथीने फिर्यादी यांना अडवून वरीलप्रमाणे जबरी चोरी करून ६,८५,५००/- रुपये रोख रक्कम पळवीली असल्याचे कबुल केले आहे. नमुद आरोपी यांना अटक करून वर नमूद रक्कम जप्त करण्यात आली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास हा पोउपनि/संजय भुसाळ, नेमणुक जव्हार पोलीस ठाणे हे करत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि / किशोर मानभाव, जव्हार पोलीस ठाणे, पोउपनि / संजय भुसाळ, पोउपनि/दिघोळे, पोहवा / प्रदिप विटकर, पोहवा / गायकवाड, पोहवा / नेहरे, पोना / सचिन भुसारा सर्व नेम. जव्हार पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

## मिरारोडमध्ये बनावट कागदपत्र तयार करून वास्तव्यास असलेल्या परप्रांतीय महिलेवर पोलिसांनी केली कारवाई

**■मिरारोड । प्रतिनिधी :**

अनाधिकृतरित्या मिरारोड परिसरात बनावट कागदपत्र तयार करुन वास्तव्यास असलेल्या एका बांगलादेशी महिला नागरिक हिच्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर पथकाची कारवाई. दिनांक २८/०३/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अनधिकृतपणे वास्तव्य करणारे बांगलादेशी नागरीक काशिमिरा पोलीस ठाण्याचे हद्दीतील गाळा नं. ०८ पुनम रेसिडेन्सी जवळ, शांतीपार्क मिरारोड पुर्व ता. जि.ठाणे या ठिकाणी येणार असल्याची माहिती मिळाली असुन ते समक्ष हजर राहुन दाखविणार आहे.



मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी ०४.४५ वा. सुमारास साफळा रचुन ०१ महिला बांगलादेशी नागरीक हिस महिला पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन तिच्याकडे केलेल्या चौकशीत, ति स्वतः बांगलादेशी नागरीक असुन सुध्दा तिने खोट्या कागदपत्रांचे आधारे भारतीय आधारकार्ड व पॅनकार्ड बनवुन त्याचा वापर केला तिस ताब्यात घेण्यात आले असुन सदर बाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/ उमेश पाटील यांनी सविस्तर पंचनामा केला आहे. ताब्यात घेतलेल्या बांगलादेशी महिला हिच्या विरुध्द मपोहवा / अश्विनी भिलारे यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि / देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, पोउपनिरी/ उमेश पाटील, सफौ / रामचंद्र पाटील, सफौ / राजाराम आसावले, मपोहवा/निशीगंधा मांजरेकर, पोहवा / किशोर पाटील, पोहवा/चेतनसिंग राजपुत,पोहवा / केशव शिंदे, मपोहवा / अश्विनी भिलारे व चापोहवा / सम्राट गावडे यांनी केली आहे.

## उकाडा वाढतानाच राज्यात गारपिटीसह अवकाळीचा मारा

### कुठे बिघडणार परिस्थिती?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

भर उन्हाळ्यात अचानकच महाराष्ट्रासह दक्षिण भारतामध्येसुद्धा पावसासाठी पूरक वातावकरणनिर्मिती होताना दिसत आहे. राज्याच्या बहुतांश भागांमध्ये सध्या अवकाळीचे ढग घोंगावत असून, त्याचा थेट परिणाम उत्तर महाराष्ट्रापासून थेट कोकण आणि विदर्भापर्यंत पाहायला मिळत आहेत. हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्येही अवकाळीच्या ढगांचं सावट विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यावर कायम राहणार आहे. राज्याच्या हवामानात होणाऱ्या बदलांमध्ये सातत्य कायम असून, बुधवारीसुद्धा हेच चित्र पाहायला मिळालं. पुढील चार ते पाच दिवस राज्यात ही स्थिती कायम राहणार असून, यादरम्यान अवकाळी पावसासह राज्यावर गारपिटीचाही मारा होणार असल्याचा इशारा देण्यात आल्यानं नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. एकिकडे तापमानाचा आकडा ३८ ते ३९ अंशांदरम्यान असतानाच काही भागांमध्ये उष्मा इतका वाढला आहे की हेच तापमान ४२ अंशांइतकं असल्याचं भासत आहे. मुंबईसह ठाणे, रायगड, पालघर आणि कोकण किनारपट्टी भागांमध्येही हवेत आर्द्रतेचं प्रमाण वाढल्यानं उकाडा अधिक तीव्रतेनं जाणवत आहे. राज्याच्या बहुतांश भागांमध्ये ढगाळ वातावरण असलं तरीही उष्णतेचा दाह मात्र काही केल्या कमी होताना दिसत नाहीय. पुढील २४ तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाच्या तुरळक सरींच्या शक्यतेसह ढगाळ वातावरणाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर, विदर्भात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळीचा इशारा देण्यात आला आहे. गारपिटीचा तडाखाही या भागाला बसेल असं सांगत हवामान विभागानं सतर्क केलं आहे. मराठवाड्यातही परिस्थिती वेगळी नसून जालन्यामध्येही पुढच्या २४ तासांमध्ये अवकाळीचा तडाखा बसणार आहे.

## बॉयफ्रेण्डला व्हिडीओ कॉल लावून नर्सिंग ऑफिसरने संपवलं जीवन!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

घरगुती छोट्या छोट्या वादानंतर त्याचा ताण घेऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याचे प्रकार आजकाल मोठ्या प्रमाणात होताना दिसतायत. असाच एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. जोधपूर एम्समध्ये नर्सिंग ऑफिसर असलेल्या डिंपलने आत्महत्या केली. आत्महत्या करताना डिम्पलने बॉयफ्रेण्डला व्हिडीओ कॉल केला होता. नर्सिंग ऑफिसर असलेली डिम्पल विवाहित होती पण तिच्या पतीपासून वेगळी राहत होती. ती तिचा बॉयफ्रेंड यश शखला सोबत व्हिडिओ कॉलवर बोलत असतानाच तिने आत्महत्या केली. नर्सिंग ऑफिसर डिम्पल राजस्थानच्या महादेव नगर बासनी येथे भाड्याच्या घरात राहत होते. ती मूळची गुजरातची होती. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**डिम्पलच्या वडिलांकडून पोलिसात तक्रार**

डिम्पलचे वडील राजू भाई हे गुजरातमधील रहिवासी असून त्यांनी मुलीच्या आत्महत्येसंदर्भात तक्रार दिली आहे. माझी मुलगी चित्रा डिंपल जोधपूर एम्स रुग्णालयात नर्सिंग ऑफिसर म्हणून काम करत होती आणि महादेव नगर बासनी येथे भाड्याच्या घरात राहत होती. ३० मार्च रोजी दुपारी ३ वाजता मुलगी डिंपलचा अपघात झाला असे मला कळवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बसनी पोलिस स्टेशनचे अधिकारी नितीन दवे यांनी यासंदर्भात माहिती दिली.

**यश शाखलासोबत व्हिडिओ कॉल**

डिम्पलने आत्महत्या केली तेव्हा तिचा फोन व्हिडिओ कॉल सुरु होता. त्या फोनवर दुसऱ्या बाजूस यश शखला नावाचा तरुण बोलत होता. यश शखलाने स्वतः फोन करून डिंपलच्या मित्रांना तिची चौकशी करायला सांगितले. मग मित्र खोलीत गेले आणि डिंपल फाशीला लटकलेली दिसली.



### माहिती मिळताच वडील पोहोचले जोधपूरला

मुलीच्या आत्महत्येची माहिती मिळताच नर्सिंग ऑफिसरचे वडील राजू भाई त्यांच्या नातेवाईकांसह जोधपूरला पोहोचले. डिंपलने गळफास घेतल्याचे कळताच मैत्रिणींनी तिला ताबडतोब फासावरून खाली उतरवले आणि एम्स रुग्णालयात आणले. तिथे सीपीआर देऊन डिम्पलला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तोपर्यंत डिंपलचा मृत्यू झाला होता, अशी माहिती नर्सिंग ऑफिसरच्या वडिलांनी पोलिसांना दिलेल्या अहवालात दिलीय.

**डिम्पलचे ४ वर्षांपूर्वी झाले होते लग्न**

डिम्पलचे ४ वर्षांपूर्वी लग्न झाले होते. ती सुमारे दीड वर्ष तिच्या सासरच्या घरी राहिली त्यानंतर ती तिच्या सासरच्या घरी गेली नाही, असे राजू भाईंनी त्यांच्या तक्रारीत सांगितले. डिंपलच्या सासरच्या घराचे घर पालनपुरात आहे आणि तिच्या पतीचे नाव जेनिस बोरवाल आहे. ती २ वर्षांपासून जोधपूर एम्समध्ये काम करत होती, अशी माहितीही त्यांनी दिली.

## पॅरेल सुट्टीवर आला तुरुंगात परतण्याआधीच तरुणानं...

**■छत्रपती संभाजनगर । प्रतिनिधी :**



छत्रपती संभाजनगरच्या पैठण तालुक्यात लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या दोघांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. नवनाथ शामराव जगधने (३०) आणि शीतल दोडवे-उघडे (२८) अशी मृतांची नावे आहेत. मृत नवनाथ हा जन्मठेपेची शिक्षा कारागृहात भोगत होता, एक महिन्याच्या पॅरोल सुट्टीवर तो आला होता. पॅरोल सुट्टी संपल्याने नवनाथने २८ मार्च रोजी पुन्हा कारागृहात जाणे गरजेचे होते. पण तो गेला नाही. शुक्रवारी (दि. २८) रोजी सायंकाळी विहिरीत उडी मारण्यासाठी तो गेला होता. पण, नातेवाइकांनी समजूत घालून घरी परत आणले होते. शनिवारी रात्री घराच्या टेरेसवर झोपला असताना विषारी औषध पिऊन तो गावाजवळील मक्याच्या शेतात गेला होता. त्याचासह शितलचा मृतदेह आढळून आल्याने पैठणमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कातपूर येथील नवनाथ शामराव जगधने आणि शितल दोडवे-उघडे हे दोघे पाच वर्षांपासून लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. नवनाथ शामराव जगधने याच्यावर अंबड जि. जालना येथील पोलिस स्टेशन येथे ६ वर्षीय मुलाचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली असून तो कारागृहात शिक्षा भोगत आहे. सध्या तो एक महिन्याच्या पॅरेल सुट्टीवर आला होता. त्याला २८ मार्चला पुन्हा शिक्षा भोगण्यासाठी जाण्यासाठी जायचे होते.

### 'लिव्ह इन'मध्ये राहणाऱ्या जोडप्यानं उचललं टोकाचं पाऊल

नवनाथ जगधने हा शुक्रवारी दि. 28 रोजी सायंकाळी विहिरीत उडी मारण्यासाठी गेला होता. त्यावेळी नातेवाईकांनी समजूत घालून त्याला घरी परत आणले होते. त्यानंतर शनिवारी रात्री घराच्या छतावर झोपला असता त्याने विषारी औषध प्राशन केले आणि तेथून निघून गेला. गावाजवळील मक्याच्या शेतात सोमवारी दि. ३१ रोजी त्याचा मृतदेह आढळून आला. तर शितलचे लग्न दुसरीकडे झाले असताना तिचे प्रेम कातपूर येथील नवनाथ बरोबर झाले. नवनाथ तिला भेटण्यासाठी तिच्या सासरी गेला असताना तिच्या ६ वर्षीय मुलाचा खून त्यांनी केला होता. याप्रकरणी नवनाथ शिक्षा भोगत होता. तर शितलला निर्देश मुक्त करण्यात आले होते. संभाजीनगर येथे ती भाड्याने राहत होती. काही दिवसांपूर्वी कातपुर येथे ती आली होती. सोमवारी दोघांचे मृतदेह आढळून आले आहेत. दोघांच्या आत्महत्येचे मागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# राज्यावर अवकाळीची अवकृपा

फेब्रुवारीपासूनच महाराष्ट्राचा पारा चढत आहे. मार्चमध्ये उन्हाचा कहर आणखी वाढला होता. असे असतानाच चार दिवसांपासून राज्यावर अवकाळी ढग जमलेले आहेत. ही शेतकऱ्यांसाठी काळजी करण्याची वेळ आहे. दोन दिवसात अनेक ठिकाणी सरी कोसळल्यामुळे उन्हाच्या काहिलीमुळे बेचैन झालेल्या जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला खरा पण तो तात्पुरताच ठरला. कारण या अवकाळीची झळ शेती उत्पादनाला आणि शेतकऱ्यांना बसली आहे. आधीच राज्यातील शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. तो वारंवार कर्जमाफीची मागणी करत आहे. अशी परिस्थिती असताना सध्या कर्जमाफी शक्य नाही हे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री असलेले अजित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी अगदी परखडपणे सांगितले आहे. त्यामुळे कर्जमाफीची शेतकऱ्यांची अपेक्षा यंदा आणि पुढील वर्षी शक्य नाही, हे स्पष्ट झालेले आहे. अशातच अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता प्रचंड वाढली आहे. सोमवारी बीड, जालना, अकोला, बुलढाणा, वाशीम, कोल्हापूर, सातारा तसेच चिपळूण, गुहागर (रत्नागिरी), श्रीवर्धन (रायगड) या जिल्ह्यांमध्ये पावसाने अवकाळी नजर फिरवली. शिवाय आणखी चार ते पाच दिवस अवकाळी पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हृदयाचे ठोके वाढले आहेत. ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांनाही अवकाळीचा इशारा देण्यात आला आहे. दोन दिवसांपासून कोकणातील वातावरण ढगाळ असल्यामुळे कोकणपट्टीतील आंबा आणि काजू या फळांना फटका बसण्याची शक्यता आहे. मुळात ढगाळ वातावरणामुळे कीड तसेच रोगासाठी पोषक वातावरण तयार होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे, त्यातही फळ उत्पादक शेतकऱ्यांचे टेन्शन वाढलेले आहे. त्यातही पाऊस पडला तर हातातोंडाशी आलेली रब्बी पिके मातीमोल होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने काहीसा गारवा पडला असला तरी अवकाळीमुळे शेतकरी थिजला आहे. काढणीला आलेले पीक अवकाळी पावसाने हडप केल्यामुळे अस्मानी संकट कुठे घेऊन जाणार, असा सवाल शेतकरी करत आहेत. येणाऱ्या तीन ते चार दिवसात राज्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा अवकाळी पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या अवकाळी पावसाच्या संकटाला कसे तोंड द्यायचे, याचे उत्तर सध्यातरी कोणाकडेच नाही. ही नैसर्गिक आपत्ती आहे. मात्र, यातून होणाऱ्या नुकसानीची भरपाई महायुती सरकारला शेतकऱ्यांना द्यावी लागणार आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्यांमध्ये, ज्या भागात अवकाळी पावसाने दोन दिवसांत उपद्रव दिला तेथील शेती नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याची जबाबदारी सरकारला घ्यावी लागेल. तसे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांना द्यावेत. जिथे अवकाळीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, येथील महसूल यंत्रणेलाही आताच जागे करून तशीच वेळ आली तर पंचनामे तयार करण्यासाठी तयारी ठेवावी लागेल. अवकाळी पावसामुळे गहू, फळभाज्या, फळबागांचे नुकसान झाले आहे. तसेच कोकणात सध्या ढगाळ वातावरण असून अवकाळीची अवकृपा झाली तर फळबागांचे मोठे नुकसान होईल. याची मुख्य झळ आंबा पिकाला बसेल. आंबा आता तयार झाला आहे. मात्र, ढगाळ वातावरणामुळे कीड पडून फळ खराब होते. तसेच बुरशीजन्य रोगाचीही फळाला बाधा होते. त्यामुळे शेतकऱ्यांची धडधड वाढली आहे. शिवाय कोकणासह राज्यात रब्बी पिके तयार असून ती अवकाळीमुळे झोपल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार आहे. राज्यातील बहुतांशी शेतकरी दुबार पीक घेतात. तसेच शेतीसोबत भाजीपाला, फळबागा पिकवतात. त्यासाठी शेतकऱ्यांना डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागते. पण नैसर्गिक आपत्तीवर मात करता येणे शक्य नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. शेतकऱ्यांना मदतीसाठी सरकारवरच अवलंबून राहण्याशिवाय पर्याय नसतो. कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी पूरस्थितीमुळे शेतकरी कायम संकटात असतो. त्यामुळे छोट्या शेतकऱ्यांना शेतीचा व्यवसाय आतबट्ट्याचा वाटतो. कधी कुठले संकट येईल, हे सांगता येत नाही. अशातच खते, बियाणांच्या वाढत्या किमती, मजुरीचे वाढलेले दर पाहता शेतीतून नफा मिळेल, याची शाश्वती नसते. तरीही जगाचा पोशिंदा संकटाला तोंड देत असतो. अशा वेळी पिकांना हमीभाव द्या, चार-पाच महिने दिवस-रात्र शेत पिकवण्यासाठी मेहनत घेणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा दलाल एका झटक्यात प्रचंड नफा कमावतो. ती दलाली बंद करा, ही शेतकऱ्यांची वर्षानुवर्षांपासून मागणी आहे. कधीतरी शेतकऱ्यांना अचानक भाव मिळतो तर कधी भाव कोसळतात, बऱ्याचदा शेतमाल रस्त्यावर फेकण्याची वेळ येते, अनेकदा शेतमाल खरेदीसाठी केंद्रे उपलब्ध नसतात, शेतकऱ्यांच्या अशा एक ना अनेक समस्या आहेत. याचा अंत कधी होईल, हे कुणीही सांगू शकत नाही. मात्र, सरकारने ठरवले तर शेतकऱ्यांना अच्छे दिन येण्यास वेळ लागणार नाही, गरज आहे ती फक्त इच्छाशक्तीची.

# लोकसहभागच जलजीवनला बळ देईल!

**जलजीवन अभियान टंचाईग्रस्त गावांना पिण्यायोग्य पाणी मिळवून देण्यासाठी साहाय्य करू शकते, मात्र त्यासाठी ग्रामस्थांनी आपसातील वाद बाजूला ठेवून पुढे येणे आणि जलस्रोतांची निगा राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे...**

संयुक्त राष्ट्राच्या १७ चिरस्थयी विकास उद्दिष्टांपैकी उद्दिष्ट क्रमांक सहा हे पिण्याचे शुद्ध पाणी आणि स्वच्छता या मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा आहेत असे मानते. म्हणून संयुक्त राष्ट्रांची विकास उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जगभरातील सर्वच देशांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न होऊ लागले. असे असले तरी अगदी अलीकडच्या काळापर्यंत जगातील दोन अब्जांहून अधिक लोक हे शुद्ध (सुरक्षित) पिण्यायोग्य पाण्यापासून वंचित आहेत. अनेकांना तर हे पाणी मिळवण्याकरिता विहिरी, तलाव, नद्या, साठलेली डबकी आणि झरे इत्यादी सारख्या पाण्याच्या स्त्रोतापर्यंत पोहोचण्यासाठी दूरवर प्रवास करावा लागतो आणि हे पाण्याचे स्त्रोत सहसा अशुद्ध पाणीच पुरवतात. त्यामुळे जगभर अतिसार आणि कॉलरा यासारख्या दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यातही अतिसार या एका आजारामुळेच दरवर्षी आठ लाखांपेक्षा अधिक लोक दगावतात आणि त्यातील जवळपास ५० टक्के मृत हे वय वर्षे पाचच्या खालची मुले असतात.



भारतातही पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचे बळी मोठ्या प्रमाणात आहेत. राष्ट्रीय आरोग्य पाहणी अहवालानुसार भारतात २०२२ मध्ये ५५ लाखांपेक्षा अधिक अतिसराचे रुग्ण आढळले आणि त्यापैकी १००६ रुग्ण दगावले आहेत. पाणी जर रासायनिक घटकांमुळे दूषित असेल तर मात्र त्याचे कर्करोग आणि हृदयविकार या स्वरूपात अतिशय गंभीर परिणाम होतात. भारतात १९५१ ते २०१९ पर्यंत साधारणपणे हातपंप, संरक्षित विहिरी आणि सार्वजनिक पाण्याच्या टाक्यांतूनच पाणीपुरवठा केला जात असे. पण २०१७ मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय जल गुणवत्ता उप-अभियानाने मात्र पाण्याच्या गुणवत्तेच्या समस्येला सोडवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बदल घडून आणला, विशेषतः जिथे फ्लोराईड आणि आर्सेनिकमुळे पाणी अधिक प्रमाणात दूषित आहे अशा प्रदेशांमध्ये याचा अधिक उपयोग झाला.

या अभियानामुळेच पुढे जलजीवन अभियानाचा पाया रचला गेला ज्याची सुरुवात २०१९ मध्ये झाली. जलजीवन अभियान हा देशातील शंभरटक्के कुटुंबांना, दीर्घकाळ, पुरेसे, सुरक्षित आणि परवडण्या योग्य किमतीत नळाद्वारे पाणीपुरवठा करून देऊन ग्रामीण जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणारा एक व्यापक कार्यक्रम आहे. या अभियानाच्या जोडीला 'जलशक्ती अभियान' आणि 'अटल जल योजना' यासारखे पूरक कार्यक्रमदेखील लोकसहभागाच्या माध्यमातून जलसंवर्धनासाठी सुरू आहेत.

जलजीवन अभियान राज्य, जिल्हा आणि गाव या तीन पातळ्यांवर काम करते. राज्य आणि जिल्हा स्तरावर पाणी व स्वच्छता मिशन तर गाव पातळीवर पाणी समिती यांच्यामार्फत जलजीवन अभियानाची अंमलबजावणी केली जाते. या अभियानात केंद्र सरकार हे केंद्रशासित प्रदेशांना १०० टक्के, हिमालयीन राज्यांना ९० टक्के, आणि इतर राज्यांना ५० टक्के निधी पुरवते. हा निधी ग्रामीण लोकसंख्या, अनुसूचित जाती जमातींची लोकसंख्या, वाळवंटी किंवा डोंगराळ प्रदेश, रासायनिक प्रदूषण असलेले क्षेत्र आणि कुटुंबांची गरज इत्यादी बाबी विचारात घेऊन वितरित केला जातो. या अभियानाअंतर्गत वर्ष २०२४ संपेपर्यंत देशातील सर्वच कुटुंबांना पिण्यायोग्य पाण्याची नळ जोडणी करून दिली जाईल, असे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र हे उद्दिष्ट साध्य झाले नाही, आणि आता वर्ष २०२५ सुरू झाले असता देशात एकूण ८०.३२ टक्के कुटुंबांना नळ जोडणी करण्यात आल्याचे दिसते. म्हणून यंदाच्या अंदाजपत्रकात ६७ हजार कोटीच्या वाढीव आर्थिक तरतुदीसह हे उद्दिष्ट २०२८ पर्यंत पुढे ढकलले आहे.

देशातील शंभर टक्के कुटुंबांना नळ जोडणी करून देण्याचे उद्दिष्ट जसे देश पातळीवर साध्य झाले नाही तसेच ते महाराष्ट्रातही साध्य झाले नाही, हे विशेषत्वाने नमूद करावे लागते. महाराष्ट्रात २०१९ मध्ये एकूण केवळ ३३ टक्के कुटुंबांना नळ जोडणी मिळाली होती. त्यातही जालना, जळगाव आणि धुळे हे जिल्हे ५६ ते ६३ टक्क्यांदरम्यान अशा सर्वाधिक नळ जोडणीचे जिल्हे होते.

२०१९ ते २०२५ दरम्यान गडचिरोली, गोंदिया, अहमदनगर, नांदेड, नाशिक, इत्यादी जिल्ह्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात नळ जोडणीचे काम करण्यात आले. ज्या गडचिरोली जिल्ह्यात केवळ आठ टक्के कुटुंबांना नळ जोडणी होती ते प्रमाण या काळात ९१ टक्क्यांच्याही वर गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील फ्लोराईडचे प्रमाण आढळून आलेल्या २२ जिल्ह्यांमध्येदेखील या अभियानाअंतर्गत मोठ्या प्रमाणात काम झाल्याची दिसून येते, ही आणखीन एक सकारात्मक बाब.

२०२५ मध्ये ठाणे आणि पालघर वगळता जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नळ जोडणी केल्याचे दिसते. जालना, सोलापूर, धुळे या जिल्ह्यांत तर ९९ टक्क्यांहून अधिक नळ जोडण्या झाल्या. अमरावती, वर्धा, नागपूर, सातारा, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड आणि वाशिम इत्यादी जिल्ह्यांतदेखील ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाण आहे.

या अभियानाच्या प्रगतीचा वेग मंदावाण्यात ग्रामीण भागांतील असमान भौगोलिक परिस्थिती, करोना काळ, रशिया युक्रेन युद्धामुळे लोखंड व सिमेंटच्या वाढलेल्या किमती इत्यादी कारणे सांगितली जातात. मात्र यासंदर्भात केवळ नळ जोडणीची टक्केवारी पाहून चालणार नाही तर, हे अभियान शुद्ध, पुरेसा आणि दीर्घकाळ शाश्वत पाणीपुरवठा केला जाईल या उद्देशाने सुरू झालेले आहे. म्हणून ग्रामीण भागातील जनसमुदायांनी पाण्याचे स्त्रोत शोधणे किंवा ते तयार करणे आणि पुढे त्यांची काळजी घेणे, जपणूक करणे, व समन्याय वितरण करणे गरजेचे आहे. मात्र गावांमध्ये हे घडतेच असे नाही.

या संदर्भात एक उदाहरण प्रामुख्याने नमूद करावे असे वाटते ते म्हणजे नांदेड जिल्ह्यातील पाण्याची चणचण असणाऱ्या एका खेडेगावामध्ये पदव्युत्तर वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गटाने गावातील पाण्याचा स्त्रोत, पाण्यामुळे होणारे आजार, आणि जलजीवन अभियानांतर्गत नळ जोडणीची स्थिती, स्त्रियांना आणि पुरुषांना पाणी वाहून नेण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत इत्यादीबाबतची स्थिती जाणून घेण्यासाठी एक छोटे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणादरम्यान जी निरीक्षणे नोंदविण्यात आली त्यातील एक निरीक्षण असे की त्या गावात जल जीवन अभियान पोहोचले खरे पण गावात पाण्याची टाकी कुठे बांधावी यावर गावकऱ्यांमध्ये एकमत न झाल्यामुळे या अभियानाचे काम तसेच अडून राहिले आहे. हे उदाहरण लोकसहभागाला किती महत्व आहे हे अधोरेखित करते.

म्हणून हे अभियानदेखील ग्रामीण भागातील जनसमुदायांनी त्यांच्या स्वतःच्या गावातील पाणीपुरवठा प्रणालीचे नियोजन, अंमलबजावणी, व्यवस्थापन, मालकी, संचलन आणि देखभाल करावी अशी अपेक्षा ठेवते. एवढेच नाही तर एकदा नळ जोडणी झाल्यावर पुढील काळात श्रमदान किंवा प्रासंगिक दुरुस्त्या यासाठीदेखील जन समुदायांनी तयार राहणे गरजेचे आहे. शेवटी शंभर टक्के नळ जोडणी झाली तरी पुढे ती चिरस्थायी राहण्यासाठी लोकसहभागच जलजीवनला बळकटी देईल हे मात्र खरे!

# वेतन-ए-'खास'!

वेतन आणि भत्यांमध्ये घसघशीत २४ टक्क्यांची वाढ करून केंद्र सरकारने आजी-माजी खासदारांना मोठी भेट दिली आहे. आता प्रत्येक खासदाराचे वेतन दरमहा सव्वा लाख रुपयांच्या घरात गेले आहे. सन २०१८पासून न झालेल्या पगारवाढीची आता पूर्वलक्ष्यी भरपाई होईल. 'सभासदांची मेहनत, सार्वजनिक सेवांबाबत त्यांचे समर्पण आणि ते पेलत असलेल्या जबाबदाऱ्या' यांसाठीच्या या वेतनासह त्यांना मिळणाऱ्या सुविधा पाहिल्या, तर प्रत्येकाला खासदार व्हावेसे वाटल्यास नवल नाही! मतदारसंघ आणि कार्यालयीन भत्यापोटी ७० हजार रुपये, अधिवेशन काळात दरमहा ६० हजार आणि दररोज अडीच हजार रुपये, फोन-इंटरनेटसाठी भत्ता, दिल्लीतील निवासव्यवस्था यांसह कुटुंबीयांसमवेत दर वर्षी ३४ मोफत विमानप्रवास, रेल्वेचा प्रथमश्रेणी मोफत प्रवास, दर वर्षी ५० हजार युनिट मोफत वीज अशा अनेक सुविधांचे लाभ सरकारने दिले आहेत. देशापुढील जिव्हाळ्याच्या विषयांवर कडाडून भांडणाऱ्या सर्वपक्षीय खासदारांचे वेतनवाढीच्या मुद्द्यावर मात्र अनोखे एकमत असल्याचे पूर्वीपासून दिसून येते. चार वर्षांपूर्वी झालेल्या पगारकपातीला त्यांनी मोठ्या मनाने मान्यताही दिली होती. काही लाखांच्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारांना प्रवास, कार्यकर्ते, साहायक, कार्यालयीन खर्च असे अनेक खर्च असतात. त्यामुळे त्यांचा पगार वाढला, तर इतरांच्या पोटात दुखायचे काहीच कारण नाही. मात्र, या वेतन-भत्त्यांना साजेसे काम त्यांच्याकडून होते का, हा प्रश्न गैरलागू ठरणार नाही. पगाराबरोबर खासदारांचे संसदीय कार्यातील योगदानही वाढावे, ही अपेक्षा करणे गैर नाही. खासदारांची मतदारसंघातील कामगिरी काय आहे? संसदेच्या कामकाजात त्यांनी किती भाग घेतला? किती प्रश्न विचारले? कोणत्या विधेयकांवर मते मांडली किंवा कोणत्या समितीमध्ये योगदान दिले, याची झाडाझडती नियमित घेतली गेली पाहिजे. अनेक खासदार संसदेच्या कामकाजाला दांडी मारत असल्याचे सभागृहातील अल्प उपस्थितीतून अनेकदा दिसते.

# महत्त्वाच्या मुद्यांना बगल देऊन लोकांचे 'एप्रिल फूल'

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर या अधिवेशनात लोकांच्या जीविताशी, रोजगाराशी, आरोग्य, शिक्षण, महागाई, नागरी समस्या अशा विषयांवर विधिमंडळात पुरेशी चर्चाच झालेली नाही. गैरलागू, भावनिक मुद्दे, संवेदनशील विषयावर चिखल झालेल्या राजकारणाने महाराष्ट्राच्या जनतेला झुलवत ठेवले आणि महत्त्वाच्या जिवंत मुद्द्यांना बगल दिली. नेत्यांकडून एप्रिल फूल झालेल्या लोकांनी आतातरी भानावर यावे. संवेदनशील मुद्यांच्या पलीकडे सत्तेने दिलेल्या आश्वासनानुसार खरंच आपला विकास झालेला आहे का, याची तपासणी लोकांनी करायला हवी.

वर्ष २०१४ आणि २०१९ च्या निवडणूक जाहीरनाम्यात केंद्र सरकारने दरवर्षी २ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, बेरोजगारीचा दर अजूनही चिंताजनक आहे, आणि संघटित क्षेत्रात अपेक्षित रोजगारवाढ झालेली दिसत नाही. याशिवाय वर्ष २०२२ पर्यंत शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले होते. प्रत्यक्षात, शेती क्षेत्रातील आव्हाने आणि किमतीतील अस्थिरतेमुळे हेसुद्धा उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही.

केंद्र आणि राज्य सरकारने १०० स्मार्ट शहरे विकसित करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु २०२५ पर्यंत अनेक शहरांमध्ये पायाभूत सुविधा आणि नियोजनाच्या अंमलबजावणीला विलंब झाला आहे. राज्याची सध्याची स्थिती पाहता ही आश्वासने पुढच्या वर्षाअखेरीसपर्यंत पूर्ण होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. याआधीच्या महाविकास आघाडी सरकारने २०१९ मध्ये सत्तेवर येताना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, परंतु त्याची अंमलबजावणी मर्यादित राहिली. त्यानंतर आलेल्या महायुतीच्या सरकारनेही शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीवर ठोस प्रगती दाखवलेली नाही, शेतकरी कर्जमाफीचा विषय केवळ राजकीय अजेंडा बनून राहिला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर म्हणावी तेवढी गांभीयार्ने चर्चा झाली नाही, याबाबत विरोधकांनी, माध्यमांनीही सरकारला प्रश्न विचारणे अपेक्षित होते. परंतु भावनिक अशा संवेदनशील गैरलागू मुद्यांवर जनतेला चतुर राजकारण्यांनी झुलवत ठेवण्यात यश मिळवले, लोकांना तेवढा वेळ नसतो किंवा व्यवस्थेशी लढण्याची ताकद नसते, त्यामुळे त्यांची झालेली 'बनवाबनवी' नागरिकांचा 'नाईलाज' म्हणून एकवेळ समजून घेता येईल, मात्र लोकशाहीचा चौथा खांब आणि जबाबदार पत्रकारिता करण्याचे छातीठोकपणे सांगणार्या माध्यमांनीही संवेदनशील आणि गैरलागू मुद्यांमध्येच पत्रकारितेचा महत्त्वाचा वेळ घालवला. यात सत्ताधार्यांना लोकांच्या जगण्याशी जोडलेले प्रश्न विचारणे बाजूला राहिले.

मुंबईतील मेट्रो प्रकल्प आणि रस्ते विकासासारख्या मोठ्या योजनांना अनेकदा विलंब होत आहे. उदाहरणार्थ, मेट्रो ३ पूर्ण होण्याची मुदत वारंवार पुढे ढकलली गेली. तर ग्रामीण आणि शहरी भागात पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची आश्वासने पूर्ण करण्यात अनेक अडचणी आल्या आहेत, विशेषतः राज्यातील दुष्काळग्रस्त भागाची स्थिती स्वातंत्र्यानंतर अनेक सरकारे आली आणि गेली तरी कायम आहे, कितीतरी निवडणुका आल्या आणि गेल्या त्यानंतरही तेच प्रश्न, तीच आश्वासने, लोकांची तीच फसवणूक कायम आहे. यातील निवडक आश्वासनांचा विचार यंदाच्या एप्रिल फूलच्या निमित्ताने व्हायला हवा.

केंद्र सरकारने प्रत्येक गावाला शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा देण्यासाठी 'जलस्वराज्य' आणि 'जल जीवन मिशन' सारख्या



योजनांचा विस्तार करण्याचे ठरवले होते, ते उद्दिष्ट अद्यापही पुरेसे साध्य झाले नाही. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनांचे काम अपूर्ण आहे. मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात फेब्रुवारीतच टँकर सुरू झाले आहेत. उन्हाचा तडाखा वाढेल तशी ही संख्या वाढत जाणार आहे. पाईपलाईनद्वारे पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही.

मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये पाणीपुरवठा, पाणीटंचाई, पाणी चोरी आणि पाणी गळती कमी झालेली नाही. मुंबईसारख्या शहरात अजूनही अनेक भागांत ठरावीक वेळेतच पाणी मिळते, तर पुण्यात पाणीटंचाई आणि असमान वितरणाची समस्या कायम आहे. पाणी गळतीचे प्रमाण कमी करण्यातही अपेक्षित यश मिळालेले नाही. मुंबई, ठाण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या शहापूरमधील आदिवासी गावपाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाईचा प्रश्न दरवर्षी चर्चिला जातो, मात्र त्यावर अद्यापही कायमस्वरुपी उपाययोजना झालेली नाही.

'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत प्रत्येक घरात शौचालय उभारण्याची पूर्तता झालेली नाही, अनेक ठिकाणी शौचालये उभारली आहेत, मात्र पाणी नसल्याने त्याचा वापर होत नाही. अनेक ठिकाणी बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचेही समोर आले आहे. नदीजोड प्रकल्प आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्टही साध्य झालेले नाही. पाणी साठवण, जलसंधारण, सिंचनाच्या योजना, भ्रष्टाचार, राजकीय इच्छाशक्ती, हेवेदाव्यांमुळे पूर्ण झालेल्या नाहीत. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक गावांमध्ये दुष्काळाची समस्या कायम आहे. 'जलयुक्त शिवार'सारख्या योजनांचा प्रभाव मर्यादित राहिला आणि अनेक ठिकाणी कामे अपूर्ण किंवा अर्धवट अवस्थेत आहेत.

राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. परंतु अनियमित पाऊस, दुष्काळ आणि शेतमालाला योग्य भाव न मिळणे यामुळे शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही, ज्यामुळे ग्रामीण बेरोजगारी वाढत आहे. ग्रामीण भागात रोजगाराची साधने उभारण्यात सरकारला अपयश आले आहे. यांत्रिकीकरण, माहिती आणि तंत्रज्ञानाचे संतुलन राखण्यात सरकारी यंत्रणांना अपयश आल्यामुळे रोजगाराचा प्रश्न जटील होत आहे. निवडणुकीआधी सरकारी भरतीचे आश्वासन पूर्ण झालेले नाही. त्यामुळे सरकारी नोकऱ्या रोडावल्या आहेत.

वेतन आयोग, समायोजन, नव्या पदांची निर्मिती असे कित्येक प्रश्न सुटलेले नाहीत, त्यामुळे नोकर भरती मंदावली आहे. खासगी क्षेत्रातही असंघटित क्षेत्र वाढत असल्याने कामगार कर्मचाऱ्यांच्या शोषणाला बळ मिळत आहे. संपत्तीचे असमान वितरण, शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण, कमी उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी, कामगार गरीबीत ढकलला जात आहे. मागील वर्षी मराठवाडा विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण अडीच हजार असे नोंदवले गेले होते. शिक्षण आणि पुरेशा आरोग्य सुविधांचा अभाव आहे.

ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधा कमी असल्याने लोकांचे जीवनमान उंचावलेले नाही. असंघटित क्षेत्रातील कामगारांची पिळवणूक थांबण्यासाठी सरकार आणि यंत्रणांकडे धोरणात्मक उपाय नाही, कामगार कायदे बासनात गुंडाळलेले आहेत, त्यामुळे शेतकरी आणि कामगारांना चांगले दिवस येण्याचे निवडणुकीआधीचे स्वप्न धुळीला मिळाले आहे. राज्यातील ९० टक्के कामगार असंघटित क्षेत्रातील असल्याने त्यांच्या पिळवणुकीचे प्रमाणही जास्तच आहे. कामगारांचे प्रश्न सुटले नसून आणखी जटील बनले आहेत.

कमी वेतन, सामाजिक सुरक्षा नसणे आणि नोकरीच्या अस्थिरतेमुळे सामान्य कामगार, कर्मचारी पुरता निराश झाला आहे. ग्रामीण भागातून पोटापाण्यासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर थांबलेले नाही, कोरोना काळानंतर ही स्थिती आणखी कठीण झाली आहे. दुर्गम भागात पिढ्यानपिढ्या राहाणारे आदिवासी, मागासवर्गीय, कमकुवत जात गटातले अजूनही सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगारापासून वंचित आहेत, स्वातंत्र्यापासून आजतागायत त्यांना केवळ आश्वासनेच मिळाली आहेत.

या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शेती, कौशल्य विकास, औद्योगिक विकेंद्रीकरण आणि सामाजिक समानतेवर लक्ष देणे गरजेचे असताना सरकारे मात्र कबर, मशीद, मंदिर, मटण, श्वान, सिनेमा अशा मूळ मुद्यांपासून भरकटवर्णाया विषयांना जाणीवपूर्वक प्राधान्य देत आहे, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली माध्यमेही त्याला भुलली असून यात सनदशीर, लोकाभिमुख अभिव्यक्तीचाही त्यामुळे बळी जात आहे.

महाराष्ट्राची आर्थिक स्थिती ही संमिश्र स्वरूपाची आहे. एकीकडे राज्य हे भारतातील सर्वात श्रीमंत आणि उद्योग व्यवसायात प्रगत राज्यांपैकी एक मानले जाते, तर दुसरीकडे काही गंभीर आर्थिक आव्हानेही समोर आहेत. महाराष्ट्राचे सकल उत्पन्न देशात सर्वाधिक असल्याचे कौतुक थांबवून सत्ताधाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेकडे लक्ष द्यायला हवे. शहरे आर्थिक विकासाची केंद्र म्हणून नावारुपाला येत असताना ग्रामीण आणि दुर्गम भागातील मूलभूत विकासाकडे सरकारचे दुर्लक्ष झाले आहे.

राज्यावरील कर्जाचा डोंगर कमी करण्यासाठी सर्वसमावेशक विकासाचे धोरण इच्छाशक्तीने राबवायला हवे. वारंवार होणारी कर्जमाफी हा यावरील उपाय नव्हे. लाडकी बहीण योजनेचे भवितव्य धोक्यात आल्याने या आश्वासनाचाही फेरविचार करण्याची गरज सरकारला पडत आहे. शेतकऱ्यांनाही कर्ज फेडायला लावण्यात येत आहे.

शेती, नागरिकांची, महिलांची सुरक्षा, वाढती गुंडगिरी, सामाजिक तणाव आदी सामाजिक प्रश्न निर्माण होतील, असे राजकारण नेत्यांनी आतातरी टाळायला हवे, त्यानंतर मूलभूत विकासाकडे लक्ष देता येईल. नागरिकांच्या जगण्याशी थेट संबंध असलेल्या प्रश्नांकडे पाहता येईल, अन्यथा या फसवणुकीचा अंक पुढेही कायम राहील.

# राज्याच्या सुदृढ भविष्यासाठी...



कुपोषण असलेच तर ते दूर मेळघाट आणि नंदुरबारकडे, त्याचा महानगरी मुंबईशी काय संबंध?, अशा समजुतींना जोरदार धक्के देणाऱ्या 'महाराष्ट्र टाइम्स'च्या विशेष वृत्तामधून मुंबई उपनगर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक कुपोषित बालके असल्याचे दुदैवी वास्तव समोर आले.

कुपोषण हद्दपार होऊन महाराष्ट्र निरोगी अन् सुदृढ बालकांचे राज्य होणार असल्याची स्वप्ने दाखवणारे दावे वेगवेगळ्या यंत्रणांकडून होत असताना राज्यात गेल्या महिन्यात एक लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके असल्याची माहिती एकात्मिक बालविकास योजनेमधून जाहीर करण्यात आली. गेल्या वर्षीच्या एप्रिलपासून याबद्दलची माहितीच जाहीर करण्यात आली नव्हती, हा यातला अतिरिक्त बेजबाबदारपणा. या कुपोषित बालकांमध्ये ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषणाच्या श्रेणीमध्ये आहेत, ही चिंताजनक बाब आहे. कुपोषणाच्या मागे बालमृत्यू दबा धरून बसलेले असतात, त्यामुळे कुपोषणमुक्तीसाठी केलेले प्रयत्न बालमृत्यूही रोखू शकतात. आहार, आरोग्य, पोषण या तिन्ही आघाड्यांवर प्रयत्न करताना सामाजिक कारणांचाही विचार झाला पाहिजे.

आरोग्य विभाग, महिला व बालविकास, आदिवासी विभाग, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, रोजगार हमी, सामाजिक न्याय अशा अनेक विभागांची एकत्र मोट बांधून कुपोषणमुक्तीसाठी प्रयत्न झाले पाहिजेत. आदिवासी भाग, ग्रामीण महाराष्ट्र आणि शहरे यांमधील कुपोषणाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनांमधून पाहण्याची गरज आहे. तिथली भौगौलिक, सामाजिक परिस्थिती, आरोग्यसेवा, साक्षरता असे अनेक कंगोरे या समस्येला आहेत. मात्र, एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्गत दिलेल्या माहितीमध्ये ग्रामीण आणि आदिवासी भागातील कुपोषित मुलांची नोंद नाही! मुंबई महापालिकेने उपनगरांमधील बालकांचे कुपोषण सर्वाधिक असण्यामागे लोकसंख्या, स्थलांतरितांचा भार ही कारणे दिली आहेत. मुंबईत देशातील सर्वाधिक स्थलांतर होते, ही वस्तुस्थिती आहेच, इतरत्रही स्थलांतर होते.

मेळघाटातून मध्य प्रदेशात, पालघर, नंदुरबारमधून गुजरातेत, मराठवाड्यातून कर्नाटक, पश्चिम महाराष्ट्रात गणपती ते दिवाळीपर्यंत कुटुंबांचे स्थलांतर दर वर्षी होते. स्थानिक आशा सेविका आणि अंगणवाडी सेविकेशी त्यांचा संपर्कच तुटतो. शहरांत त्यांची काळजी घेणारी यंत्रणाच नसते. अशा वेळी ते गावी परतेपर्यंत प्रचंड उशीर झालेला असतो. हे टाळण्यासाठी एक आंतरराज्य व्यवस्था असली पाहिजे. एकदा नोंदणी झालेली महिला आणि बालके देशभर कुठेही पोषण आहार आणि आरोग्यसेवेसाठी पात्र ठरायला हवेत. भविष्यातील पोषणयुक्त सुदृढ महाराष्ट्रासाठी ही पाऊले महत्त्वाची ठरतील.

# कमळकाकडीचे सॅलड

कमळकाकडी किंवा कमळाचा देठ हे काश्मिरी, सिंधी, पंजाबी खाद्यसंस्कृतीमध्ये वापरल्याचे दिसून येते. तसेच मखणा (मखाना) म्हणजे कमळाच्या बीचाही खूप प्रमाणात उपयोग करतात. कमळाच्या देठामध्ये भरपूर पोषणमूल्य असते. ही कमळकाकडी महाराष्ट्रात सहज उपलब्ध असते. मुळासारखे दिसणारे देठ मातीने माखलेले असतात. वापरायच्या आधी ते पाण्याने स्वच्छ धुऊन घेणे आवश्यक असते. तसेच त्याचे बारीक काप करून पाण्यात व्हिनेगर किंवा लिंबाचा रस घालून १०-१५ मिनिटे भिजत ठेवून त्यातील माती स्वच्छ धुऊन वापरण्यास योग्य असते. पाण्यात न भिजवता ठेवली तर देठांचे काप काळे पडतात, त्यासाठी देठ भिजवून झाल्यावर उकळत्या पाण्यातून ब्लांच करून घ्यावी. त्यातही १-२ चमचे व्हिनेगर घालावे, म्हणजे ते पांढरेशुभ्र राहतात.



**साहित्य :** कमळकाकडीची २-३ देठे, १ पिवळी आणि लाल भोपळी मिरची, ५-६ चेरी टोमॅटो, लेट्यूस.

**ड्रेसिंगसाठी :** २ चमचे ब्राऊन व्हिनेगर, २ चमचे सॅलड ऑइल किंवा ऑलिव्ह ऑइल किंवा १ चमचा तिळाचं तेल, १ चमचा मोहरीची पेस्ट किंवा पूड, चवीकरता चिल्ली फ्लेक्स, मीठ, मिरपूड.

**कृती :** वर सांगितल्याप्रमाणे कमळकाकडी धुऊन, बारीक काप करून ब्लांच करून घ्यावी. थंड करायला फ्रीजमध्ये ठेवावी. ड्रेसिंगचे सर्व साहित्य बाऊलमध्ये घेऊन ढवळून घ्यावे. भोपळी मिरची लांबट चिरून घ्यावी. चेरी टोमॅटोही कापून घ्यावेत. एका वाडग्यामध्ये लेट्यूस ठेवावा. त्यावर ब्लांच केलेली कमळकाकडी ठेवावी. त्यात भोपळी मिरची, चेरी टोमॅटो एकत्र करावे. यावर ड्रेसिंग घालावे. हे मस्त सॅलड फस्त करण्यास तयार आहे!

# चेहऱ्याच्या त्वचेसाठी पुदिना अत्यंत गुणकारी






- पचनक्रिया सुधारण्यासोबतच तोंडातील दुर्गंधीचा त्रास कमी करण्यासाठीदेखील पुदिना फायदेशीर ठरतो.
- पुदिन्याच्या पानांमध्ये 'मेन्थॉल' आणि 'अँन्टी बॅक्टेरियल' गुणधर्म असतात. उन्हात फिरल्यामुळे त्वचेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पुदिना फायदेशीर ठरतो. चेहऱ्यावर अॅक्ने, ब्रेकआऊट्स, सनबर्न, त्वचा लालसर होणे अशा अनेक समस्यांवर पुदिना परिणामकारक आहे.
- त्वचेसाठी मुलतानी मातीचा उपयोग स्त्रीवर्ग करत असतो. प्रामुख्याने तेलकट त्वचा असणाऱ्यांमध्ये त्वचेशी निगडित अनेक समस्या वाढतात. त्वचेतील तेल दूर करण्यासाठी, क्लिंजिंगसाठी मुलतानी मातीसोबतच पुदिनाही फायदेशीर ठरतो.
- मुलतानी माती, ताजी पुदिन्याची पानं, मध आणि दही एकत्र करा. हे मिश्रण सुमारे २० मिनिटं त्वचेवर लावा. फेसपॅक सुकल्यानंतर स्वच्छ पाण्यामध्ये चेहरा धुवा. या पॅकमुळे त्वचा मॉईश्चराईज होण्यास मदत होते.
- गुलाबपाणीदेखील त्वचेची पीएच व्हॅल्यू सुधारण्यास मदत करतात. यामधील दाहशामक गुणधर्म त्वचेचे सौंदर्य खुलवते. पुदिन्याच्या पानांसोबत मध आणि गुलाबपाणी यांचे मिश्रण देखील फायदेशीर आहे.

## पायांना आराम देण्यासाठी
# सरळ उपचार पद्धती

**कामाच्या निमित्ताने सतत एका जागेवर बसून काम केल्याने पाय कडक होतात. ऑफिसमध्ये एकाजागी तासन् तास बसून काम करावे लागल्यामुळे या समस्यांना सामोरे जावे लागते. पाठदुखीचाही त्रास होत असतो. खाली दिलेल्या गोष्टींमुळे आपण पायांना आराम देऊ शकता.**




- सर्वप्रथम जमिनीवर पाय समोर पसरून बसा.
- उजवा पाय गुडघ्यात वाकवून आपल्या डाव्या पायाच्या गुडघ्यावरून डाव्या पायापलीकडे ठेवा.
- उजव्या पायाचा गुडघा हाताने दाबून डाव्या खांद्याकडे न्या.
- आपल्या नितंबाला व कंबरेतील पेशींमध्ये तणाव जाणवेल तेव्हा आपली पाठ ताठ ठेवावी. २० सेकंद याच मुद्रेत राहून पाय जमिनीवर पसरवा. तसेच उजवा पाय पसरून हाच व्यायाम डाव्या पायावर करावा.

# रडण्यानेही वजन कमी होते!

**आपल्या** आजूबाजूला एखादी व्यक्ती जर रडत असेल तर त्या व्यक्तीस पहिला प्रश्न असतो तो म्हणजे, का रडत आहात? मानसिक स्थिती, वर्तणुकीतील बदल, कधी नैराश्य तर कधी अति उत्साहीपणा अशा अनेक कारणांमुळे माणसाच्या डोळ्यांमध्ये आपसूक पाणी येते. पण तुम्हाला ठाऊक आहे का? रडणं आरोग्यास एक प्रकारे लाभदायक सुद्धा ठरू शकतं. 'AsiaOne'ने सादर केलेल्या अहवालात रडण्यामुळे वजन कमी होते, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जेव्हा आपण रडतो तेव्हा आपल्या शरीरातून कॉर्टिसोल हार्मोन बाहेर सोडले जातात. शरीरातील हे वाढीव कॉर्टिसोल हार्मोन्स शरीरातील चरबी कमी करण्यास मदत करतात. तसेच, तणावग्रस्त अश्रू आपल्या शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, जे वजन कमी करण्यासाठी फार फायद्याचे ठरते. असे कित्येक लोक असतात की त्यांना सहजपणे रडता येत नाही. त्यामुळे रडण्याचे फायदे आणि त्यामागील भावना अनुभवणे त्यांच्यासाठी कठीण होऊ शकते. तुम्हाला कदाचित माहीत नसेल, पण रडण्याचे सुद्धा प्रकार आहेत, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. रडण्याचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. 'बेसल', 'रिफ्लेक्स' आणि 'मानसिक अश्रू.' आपल्या डोळ्यांना ओलसर ठेवण्याचे काम 'बेसल' अश्रू करतात. धूळ किंवा प्रदूषण यांपासून सुरक्षित ठेवण्याचे काम 'रिफ्लेक्स' अश्रू करतात. त्याचबरोबर मानसिक अश्रू वास्तविक भावना आणि मानवी भावनांसह जोडलेले असतात. मानसिक अश्रूंमुळे वजन कमी होण्यास मदत होते. जेव्हा आपण विश्रांती घेतो, तेव्हा आपल्या शरीरातील चरबी प्रत्येक तासाला वाढत असते. आपण भावनिकरीत्या तणावग्रस्त असतो तेव्हा आपल्या हृदयाची गती वाढते. त्यामुळे सायंकाळी ७ ते १० वाजण्याच्या दरम्यान रडल्यास वजन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे यापुढे 'आय हेट टीअर्स....' म्हणण्यापेक्षा 'आय लव्ह टीअर्स' म्हणा आणि तुम्हाला कधीही रडायला येत असेल तर अश्रू थांबवू नका, त्यांना वाहू द्या.




# स्मार्ट टीव्ही विकत घेताय?... 'या' पाच गोष्टी आधी नक्की तपासा!



**गेल्या काही वर्षांत आपल्या घरातील सर्वच प्रॉडक्ट्समध्ये फार मोठमोठे बदल झाले आहेत. यातील एक म्हणजे टेलिव्हिजन. आधी मोठे असणारे टीव्ही हळूहळू चपटे होत गेले आता तर अगदी स्लिम टीव्ही त्यातदेखील स्मार्ट टीव्ही आले आहेत. दरम्यान, आता तुम्हीही एखादा स्मार्ट टीव्ही घेणार असाल तर खूप सारे बजेट ऑप्शन्स तुम्हाला मिळतील, पण खूप ऑप्शन्स पाहून गडबड करू नका स्मार्ट टीव्ही घेताना काही महत्त्वाच्या गोष्टी नक्की चेक करा. टीव्ही खरेदी करताना, कलर व्हॉल्युम, एचडीआर, रिफ्रेश रेट, एचडीएमआय कनेक्शन आणि एचडीआर हे सारं समजून घ्या, अन्यथा तुम्हाला पश्चाताप होईल. प्रीमियम टीव्ही खरेदी करणं आपल्यापैकी अनेकांच्या बकेट लिस्टमध्ये असतं. पण नवीन टीव्ही खरेदी करताना, बहुतेक ग्राहक ज्या दोन गोष्टींकडे लक्ष देतात त्या म्हणजे टीव्हीचा आकार आणि त्याची किंमत. पण याशिवाय इतरही फीचर्सवर लक्ष द्यायला हवं ती कोणती आणि कसे हे जाणून घेऊ...**

◆ **रिफ्रेश रेट :** स्क्रीनवरील चित्र एका सेकंदात किती वेळा रिफ्रेश होते याला टीव्हीचा रिफ्रेश रेट म्हणतात. हे हर्ट्झमध्ये मोजले जाते. हर्ट्झ जितके जास्त तितके चित्र नितळ आणि सुंदर दिसते. साधारण टीव्हीमध्ये 60Hz तर उच्च श्रेणीतील टीव्हींमध्ये 120 Hz ते 144 Hz इतका रिफ्रेश रेट असतो. उच्च रिफ्रेश रेट टीव्ही कमीत कमी मोशन ब्लरसह स्पष्ट व्हिज्युअल वितरित करतात, जर तुम्ही गेमर असाल किंवा तुम्हाला अॅक्शन चित्रपट पाहणे आवडत असेल, तर उच्च रिफ्रेश रेट तुमच्यासाठी एक महत्त्वाची गोष्ट आहे.

**एचडीआर :** एचडीआर म्हणजेच हाय डायनॅमिक रेंज तंत्रज्ञान हे टीव्हीवर येणाऱ्या चित्रांमध्ये अधिक भारी रंग, ब्राइटनेस आणि कॉण्ट्रास्ट टाकते. गोरे अधिक पांढरे, काळे काळे आणि इतर रंग अधिक खोल दिसण्यासाठी एचडीआर ची सुरुवात केली आहे. एचडीआरमुळे टीव्हीवर एक भारी चित्र तयार होते आणि एक भारी अनुभव येतो.



◆ **एचडीएमआय :** एचडीएमआय म्हणजेच हाय डेफिनेशन मल्टीमीडिया इंटरफेस म्हणजे सोप्या शब्दात काय तर तुमच्या टीव्हीच्या स्क्रीनचा ज्यासाठीही वापर कराल ती गोष्टी एचडीएमआय केबलने जोडली जाते. म्हणजेच तुम्ही डिश टीव्हीवर काही पाहणार असाल किंवा गेमिंग कन्सोल जॉईन करून गेम खेळणार असाल हे सारं एचडीएमआयने केलं जातं. दरम्यान, चांगल्या गुणवत्तेच्या एचडीएमआय केबल्सने अधिक फास्ट आणि चांगला डेटा ट्रान्सफर होतो. टीव्ही ज्या प्रकारे त्याचे एचडीएमआय आणि इतर कनेक्शन हाताळतो, ते त्याच्या सेटअपवर अवलंबून असते. याशिवाय, आजकाल ड्युअल बँड वाय-फाय टीव्ही येऊ लागले आहेत, त्यामुळे हे ड्युअल बँड टीव्हीच खरेदी करण्यासाठी सध्या बेस्ट आहेत

◆ **स्क्रीन साईज :** टीव्ही विकत घेताना, त्याच्या स्क्रीनचा आकार ही एक फार महत्त्वाची गोष्ट असून आपण सारेच ती पाहतो. पण असंही होऊ शकतं की तुमची निवड आणि तुमच्या घराचा आकार एकमेकांच्या विरुद्ध असेल. म्हणजे तुमच्या हॉल किंवा बेडरूममध्ये जिथेही ठेवायचा आहे, त्या खोलीच्या अनुरूप आकाराचा टीव्ही घ्यावा. कारण खोली छोटी आणि टीव्हीची साईज मोठी झाल्यास तुम्हाला चांगला अनुभव येणार नाही.

◆ **कलर व्हॉल्युम :** कलर व्हॉल्युम म्हणजे काय तर टीव्हीच्या सर्व ल्युमिनन्स स्तरांवर अचूक रंग तयार करण्याची टीव्हीची क्षमता. कलर व्हॉल्युम जितका जास्त असेल तितका टीव्ही अधिक चांगले रंग देऊ शकतो. कलर व्हॉल्युमचे मोजमाप हा यूएचडी टीव्हीच्या विविध प्रकाश परिस्थितींमध्ये टीव्ही कसा कार्य करतो हे लक्षात घेऊन, पाहण्याचा अनुभव कसा आहे हे पाहण्याचा एक मार्ग आहे. कलर व्हॉल्युम महत्त्वाचा आहे, कारण जर एखादे चित्र टीव्हीच्या कमाल ल्युमिनन्सपेक्षा जास्त असेल, तर ते फिकट झालेले दिसेल, ज्यामुळे पाहण्याच्या अनुभवाची गुणवत्ता खराब होईल.

## वजन घटवण्यासाठी
# 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'अॅडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.


चहात अॅण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील अॅण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



# अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

**दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.**



**लठ्ठपणाचे** निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे. लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिसऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा. दिवसभरात आवश्यक तेवढे पाणी प्या. काकडी, लिंबू, आलं, पुदिन्याचा रस वजन कमी करण्यास मदत करतात. विशेषतः पोटातील फॅट कमी करण्यास या फळांचा रस फायदेशीर ठरतो. फॅट कमी करण्यासाठी ग्रीन टी, दही, डाळी, ओट्स, अंडी अशा पदार्थांचे सेवनही लाभदायक ठरते.

# कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

**पिकलेली** केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे 'ब्लॉकेज' उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.



# मराठीत बोला नाहीतर धडा शिकवू...

## मनसेची विविध ठिकाणी आंदोलने, ठाण्यात मनसेचा टपाल विभागालाही दणका

**■ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात दिलेल्या आदेशानंतर ठाण्यातील बँकेमध्ये तसेच आस्थापनांमध्ये मराठीचा वापर होतो की नाही, याची पाहणी पक्ष कार्यकर्त्यांनी सुरू केली असून त्यात मराठीचा वापर होत नसलेल्या ठिकाणी मनसेने आंदोलन करण्यास सुरूवात केली आहे. अशाचप्रकारे गुरूवारी मनसेने शहरात विविध ठिकाणी आंदोलने केली. यावेळी मराठीत बोला नाहीतर धडा शिकवू असा इशारा त्यांनी बँका तसेच आस्थापनांच्या अधिकाऱ्यांना दिला. त्याचप्रमाणे टपाल विभागालाही दणका देत शासनाने दिलेल्या आदेशाची आठवण करून दिली.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात दिलेल्या आदेशानंतर राज्यभरात मनसे कार्यकर्त्यांकडून आंदोलने सुरू झाली आहेत. अशाचप्रकारे ठाण्यातही मनसेकडून आंदोलने सुरू झाली आहेत. महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन आदेशाचा अनुषंगाने महाराष्ट्रात असलेल्या शासकीय, निमशासकीय व इतर शासन संचालित अस्थापनांना आपल्या दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर प्रामुख्याने करणे अनिवार्य केले आहे. या आदेशाची अंमलबजावणी होत आहे की नाही, याची पाहाणी मनसे कार्यकर्त्यांनी सुरू केली असून त्यामध्ये ज्या बँका तसेच आस्थापनांमध्ये मराठीचा वापर होत नाही किंवा तेथील अधिकारी आणि कर्मचारी मराठीत बोलत नाहीत. त्याठिकाणी मनसेकडून आंदोलने करण्यात येत आहेत. अशाचप्रकारे भारत सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या टपाल विभागात मनसेच्या जनहित व विधी विभागाचे ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी गुरुवारी आंदोलन केले.

या आंदोलनादरम्यान मनसे कार्यकर्त्यांनी तेथील अधिकाऱ्यांना शासनाने दिलेल्या आदेशाची आठवण करून देत स्वतःच्याच राज्यात पाहुणे बनू नका महाराष्ट्रात मराठीचा वापर करा असा संदेश असलेली प्रतिमा भेट दिली. येत्या पंधरा दिवसात सदर टपाल विभागातील व्यवहार मराठी भाषेत झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला. तसेच शहरातील केंद्रशासन संचालित विविध आस्थापना यांच्या मध्ये मराठीचा वापर प्रामुख्याने करावा आणि तसे केले नाहीतर संबंधित आस्थापनां चालकांना धडा शिकवण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# मराठीत बोलणार नाही, मनसे कार्यकर्त्यांनी दाखविला हिसका

## कोपरी परिसरातील एसबीआयच्या शाखेत घडला प्रकार

**■ठाणे :** मराठीत बोलणार नाही, काय करायचे असेल ते करून घ्या, अशी भाषा ठाण्याच्या कोपरी भागातील एका बँकेच्या महिला अधिकाऱ्याने वापरल्यामुळे संतप्त झालेल्या मनसे कार्यकर्त्यांनी राज्यातील कायद्याची आठवण करून देत या अधिकाऱ्याला चांगलाच हिसका दाखविला. यामुळे संबंधित महिला अधिकाऱ्याच्या केबीनमध्ये काही काळ तणावाचे वातावरण होते. अखेर संबंधित अधिकाऱ्याने माफी मागिल्याचा दावा मनसेच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात दिलेल्या आदेशानंतर ठाण्यातील बँकेमध्ये तसेच आस्थापनांमध्ये मराठीचा वापर होतो की नाही, याची पाहणी पक्ष कार्यकर्त्यांनी सुरू केली असून त्यात मराठीचा वापर होत नसलेल्या ठिकाणी मनसेने आंदोलन करण्यास सुरूवात केली आहे. अशाचप्रकारे ठाण्यातील मनसे कार्यकर्त्यांकडून बँकांना पत्र देऊन त्यात राज्यातील कायद्यानुसार मराठीचा वापर करण्याची सुचना केली जात आहे. तसेच ज्या ठिकाणी मराठीचा वापर होत नाही अशा ठिकाणी आंदोलन करण्यास सुरूवात झाली आहे.

दरम्यान, मनसेच्या महिला ठाणे शहराध्यक्ष समिक्षा मार्कंडे, मनसेचे ठाणे उपशहराध्यक्ष मनोहर चव्हाण, विभागप्रमुख संदीप साळुंखे, राजेश बागवे, पप्पु कदम या सह कार्यकर्ते कोपरी भागातील एसबीआय बँकेच्या शाखेत पत्र देण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी बँकेच्या महिला अधिकारीला पत्र देऊन मराठीचा वापर बँकेच्या दैनंदिन व्यवहारात करण्याची मागणी केली. मात्र, त्या अधिकाऱ्यांनी इतके जण कार्यालयात कसे आले, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच मराठीत बोलणार नाही, काय करायचे असेल ते करून घ्या, अशी भाषा वापरली. यामुळे संतप्त झालेल्या मनसे कार्यकर्त्यांनी त्या महिला अधिकारीला धारेवर धरले.

महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन आदेशाचा अनुषंगाने महाराष्ट्रात असलेल्या शासकीय, निमशासकीय व इतर शासन संचालित अस्थापनांना आपल्या दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर प्रामुख्याने करणे अनिवार्य केले आहे. या आदेशाची आठवण करून देत दुसऱ्या राज्यातून इथे पैसे कमविण्यासाठी येता मग, इथली भाषा शिकण्यात आणि ती बोलायला काय अडचण आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. यामुळे संबंधित महिला अधिकाऱ्याच्या केबीनमध्ये काही काळ तणावाचे वातावरण होते. या संदर्भात मनसेच्या महिला ठाणे शहराध्यक्ष समिक्षा मार्कंडे यांच्याशी संपर्क साधला असता, कोपरी भागातील एसबीआय बँकेच्या शाखेतील महिला अधिकारीला पत्र देऊन मराठीचा वापर बँकेच्या दैनंदिन व्यवहारात करण्याची मागणी केली. त्यावर तिने मराठीत बोलणार नाही, काय करायचे असेल ते करून घ्या, अशी भाषा वापरली. यामुळे त्यांना राज्यातील कायद्याची आठवण करून देत हिसका दाखविताच त्यांनी माफी मागितली, असे त्यांनी सांगितले.

# सावधान! कबुतर, कुत्री, मांजर यांना खाऊ घालणाऱ्यांनी ही बातमी नक्की वाचा

**■मुंबई :** भूतदया म्हणून प्राण्यांना, पक्ष्यांना अन्न खाऊ घालत असाल तर यापुढे पालिका तुम्हाला ५०० रुपये दंड करणार आहे. कबुतर, कुत्री, मांजरी, गायी यांना सार्वजनिक ठिकाणी कोणी खाऊ घालत असेल आणि त्याचा इतरांना त्रास होत असेल तर अशा प्रकरणात ५०० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. पालिकेच्या घनकचरा विभागाच्या नव्या नियमावलीत ही तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. याबाबत येत्या काळात कठोर कारवाई करण्याचे पालिका प्रशासनाने ठरवलं आहे.



### कबुतरांना खाणं देणं महागात

गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील दादर इथला कबुतरखाना हटवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तसंच इतरत्रही अनेक ठिकाणी कबुतरांना दाणे घालून अनधिकृत कबुतरखाने सुरु झाल्याबद्दल नागरिक समाजमाध्यमावर संताप व्यक्त करत असतात. मांजरीना, श्वानांना रस्त्यावर खाऊ घालणाऱ्यांवरूनही अनेकदा वाद होत असतात. दादर रेल्वे स्टेशनबाहेर पडल्यानंतर पहिल्याच चौकातील कबुतरखाना ही दादरची खास ओळखच आहे. हा ब्रिटिशकालीन कबुतरखाना कायमस्वरुपी बंद करण्याची मागणी याआधी अनेकदा करण्यात आली. ग्रेट २ ची हेरिटेज वास्तू असलेला दादरचा कबुतरखाना १९३३ मध्ये खरंतर पाण्याचा कारंजा म्हणून बांधण्यात आला होता. नंतर हळूहळू त्याचं कबुतरांचं अनधिकृत खाद्यकेंद्र बनलं. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनीही या कबुतरखान्याविरोधात महापालिकेला पत्र लिहिलं होतं. कबुतरांमुळे दादरमधील अनेक रहिवासी, लहान मुलं आणि वयोवृद्धांना श्वसनाचे विकार जडल्याचं त्यांनी या पत्रात म्हटलं होतं. पक्ष्यांची विष्ठा आणि पिसांमुळे अनेक इमारतींच्या खिडक्या खराब झाल्याचाही त्या पत्रात उल्लेख होता. दादरमधील हा कबुतरखाना बंद करण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली होती. मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन आरोग्य आणि स्वच्छता उपविधी २००६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या नव्या नियमावलीचा मसुदा १ एप्रिल रोजी मुंबई महापालिकेने प्रसिद्ध केला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे स्वच्छता आणि आरोग्य उपविधी २००५ हे सध्या लागू आहेत. या उपविधीमध्ये कालसुसंगत तसेच विविध शासकीय, प्रशासकीय बदल करून नवीन मसुदा तयार करण्यात आला आहे. त्यात रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी प्राणी पक्ष्यांना खाऊ घालणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

## कोट्यवधी रुपयांचे घबाड, लाच प्रकरणानंतर एसीबीकडून झाडाझडती

# पुण्यात अधिकाऱ्यांच्या घरावर छापेमारी

**■पुणे :** पुणे शहरातील ससून रुग्णालये गेल्या काही वर्षांपासून वादाग्रस्त ठरत आहे. ससूनमधून ड्रग्स पुरवठ्याचे रॅकेट समोर आले होते. त्यानंतर ससूनमधून येरवडा कारागृहातील कैदी पळाला होता. या प्रकरणांची धुळ शांत होत नाही तोपर्यंत ससूनमधील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले आहे. ससून रुग्णालयातील दोन अधिकाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांच्या घरावर छापेमारी सुरु झाली. त्यात कोट्यवधी रुपयांचे घबाड मिळाले आहे.





### अशी मिळाली अपसंपदा

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १ लाख रुपयांची लाच घेताना दोघांचा बुधवारी अटक केली होती. ससूनमध्ये अधिकारी असलेल्या जयंत चौधरी आणि सुरेश बनवले यांना अटक करण्यात आली होती. आता त्यांच्या घरात छापेमारी सुरु केली आहे. त्यात जयंत चौधरी यांच्याकडून ३९ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. तर सुरेश बनवले यांच्या घरातून तब्बल १ कोटी ३५ लाख ९५ हजार रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. एसीबीच्या छापेमारीत दोन्ही अधिकाऱ्यांच्या घरात मोठे घबाड मिळाले आहे.

पुणे शहरातील ससून रुग्णालये ड्रग्ज प्रकरणातील आरोपी ललित पाटील पळून गेल्यानंतर देशभर चर्चेत आले. त्यानंतर पोर्शे कार अपघातातील अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. त्यानंतर त्याची चर्चा अनेक दिवस झाली. त्यानंतर बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यालय अधीक्षक सुरेश बोनावळे आणि वरिष्ठ सहाय्यक जयंत चौधरी यांना एक लाख रुपयांची लाच घेताना बुधवारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले होते.

### घरावर छापेमारी

महाविद्यालयातील फर्निचर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडे त्यांनी लाच मागितली होती. दहा लाखांचे बिल काढण्यासाठी ही लाच मागितली. बुधवारी त्यांना पकडल्यानंतर त्यांनी जमा केलेली अपसंपदा शोधून काढण्याचे काम एसीबीने सुरु केले. दोन्ही अधिकाऱ्यांच्या घराबर छापेमारी करत मोठ्या प्रमाणावर रोकड आणि संशयास्पद कागदपत्रे जप्त केली. या अधिकाऱ्यांना आज न्यायालयातही हजर करण्यात येणार आहे.

# अतिक्रमणे हटवण्यासाठी हालचाली सुरू... तहसिलदारांकडून शासकीय जमिनींचे सर्वेक्षण

**■अंबरनाथ :** जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांचा विषय राज्याचे नगरविकास विभागाचे सचिव आणि लोकप्रतिनिधींच्या बैठकीत उपस्थिती झाल्यानंतर आता महसूल प्रशासनाने शासकीय जमिनींचे सर्वेक्षण सुरू केले आहे. शासकीय जमिनी, गावठाण या जागांवर अतिक्रमण झाले आहे का हेही या माध्यमातून तपासले जाते आहे. मात्र अशा बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी होते आहे. गेल्या काही वर्षात ग्रामीण भागात शासकीय जागांवर अतिक्रमणे उभे राहण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि अंबरनाथ तालुक्याच्या वेशीवर असलेल्या जागेवर हे प्रमाण अधिक दिसून आले आहे. अंबरनाथ तालुक्यात भारतीय वायू दलाच्या जागेवरही मोठ्या प्रमाणावर चाळी उभारण्यात आल्याची बाबही समोर आली आहे. लोकसत्ता ठाणेमध्ये याबाबत सविस्तर वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. अनधिकृतपणे बांधण्यात आलेल्या या चाळींमध्ये चोरून पाणी घेतले जाते. सांडपाणी आणि कचरा प्रश्नही या चाळींमुळे वाढला आहे. असे असताना यावर कारवाई करायची कुणी असा प्रश्न उपस्थित केला जातो. गेल्या आठवड्याच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता.



# प्रसिद्ध रिलस्टारच्या कारनाम्याने डोंबिवली हादरली

**■डोंबिवली :** डोंबिवलीतील चर्चित रील स्टार आणि बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र पाटील याच्या विरोधात बलात्काराचा गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. पुण्यातील एका तरुणीला मुंबई एअरपोर्टवर एअरहोस्टेसची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्याने तिला बंदुकीचा धाक दाखवला. या बंदुकीच्या धाकावर बलात्कार केल्याचा आरोप आहे. एवढेच नाही, तर पुन्हा ऑफिसमध्ये बोलावून तिच्यावर अश्लील कृत्य केल्याचा आरोप पीडितेने केला आहे. हा गुन्हा दाखल होताच सुरेंद्र पाटील पसार झाला आहे. सध्या मानपाडा पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



डोंबिवलीतील वादग्रस्त रील स्टार सुरेंद्र पाटील याच्यावर आणखी एका गंभीर गुन्ह्याची नोंद झाली आहे. पुण्यातील एका तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार सुरेंद्र पाटील याने तिला मुंबई एअरपोर्टवर एअरहोस्टेसची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. तिला कागदपत्रांसाठी डोंबिवलीतील आपल्या ऑफिसमध्ये बोलावले. तरुणी ऑफिसमध्ये पोहोचताच त्याने तिला एका खोलीत नेले. बंदुकीचा धाक दाखवत तिच्यावर बलात्कार केला. तसेच, हा प्रकार कुठेही सांगितल्यास तिच्या आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी दिली.

काही दिवसांनी, पुन्हा कागदपत्रांसाठी बोलावून त्याने बलात्काराचा प्रयत्न केला. विरोध केल्यावर तिला चोरीचा आळ लावत नग्न करून झडती घेण्याच्या बहाण्याने अश्लील कृत्य केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यात सुरेंद्र पाटीलच्या ड्रायव्हरने देखील अश्लील कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपी सुरेंद्र पाटील सध्या फरार आहे. गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर रील स्टार म्हणून चर्चेत असलेल्या सुरेंद्र पाटीलच्या या गंभीर कृत्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. याआधीही तो पोलिसांच्या खुर्चीत बसून रील बनवल्यामुळे वादात सापडला होता. मात्र, आता त्याच्यावर बलात्कारासारखा गंभीर आरोप झाल्याने पोलिसांची कारवाई महत्त्वाची ठरणार आहे.

# आर्थिक परिस्थिती बेताची, अन् बनली वेश्या व्यवसायातील दलाल

**■ठाणे :** ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाने वेश्या व्यवसाय करणाऱ्या दलाल महिलेस अटक केली आहे. पोलिसांनी तिच्या तावडीतून दोन बळीत मुलींची सुटका केली आहे. महिलेविरोधात श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आर्थिक परिस्थिती वाईट झाल्याने वेश्या व्यवसाय चालवित असल्याचे अटकेत असलेल्या महिलेने सांगितले.

शिळफाटा भागातील एका गृहसंकुलात दलाल महिला राहते. ही महिला ठाण्यातील वागळे इस्टेट भागातील एका हॉटेलमध्ये दोन महिलांना घेऊन येणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी एक पथक स्थापन केले.

त्यानुसार, महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहल शिंदे, पोलीस उपनिरीक्षक डी. व्ही. चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक एन.डी. क्षिरसागर, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रद्धा कदम, डी. के. वालगुडे, पोलीस हवालदार के.बी. पाटील, व्ही.आर. पाटील, आर.यु. सुवारे, महिला पोलीस अंमलदार पी. जी. खरात, एच.आर. थोरात, यु.एम. घाडगे यांच्या पथकांनी मंगळवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास सापळा रचून पथकाने हॉटेलमध्ये दलाल महिलेला ताब्यात घेतले. तसेच तिच्या तावडीतून दोन महिलांची सुटका केली.

तिच्याविरोधात श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. महिलेची चौकशी केली असता, पतीच्या निधनानंतर आर्थिक परिस्थिती बेताची झाल्याने ती वेश्या व्यवसायत पडल्याचे सांगितले. ठाणे, कल्याण आणि उल्हासनगर भागात ती वेश्या व्यवसाय चालवित असल्याचे चौकशीत समोर आले. याप्रकरणात पोलिसांनी तिलाअटक केली आहे.

# ५० हजारांना मुलगा न दिल्याने पठ्ठ्याने केले अपहरण... नेमकं काय प्रकरण?



**■पिंपरी- चिंचवड :** ५० हजार रुपयांमध्ये मुलगा विकत न दिल्याने त्याचे अपहरण केल्याची घटना पिंपरी- चिंचवडमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी अवघ्या काही तासातच अपहरणकर्त्याकडून आठ वर्षीय चिमुकल्याची सुटका करण्यात खंडणी विरोधी पथक आणि रेल्वे सुरक्षा बलाला यश आलं आहे. ३१ मार्च रोजी चिंचवडमधून ओळखीच्या व्यक्तीने आठ वर्षीय चिमुकल्याचे अपहरण केल्याची तक्रार चिंचवड पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. या प्रकरणी १ एप्रिल रोजी चिंचवड पोलिस ठाण्यात महिलेने तक्रार नोंदवली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या मदतीने अपहरणकर्त्या मुलाची सुखरूप सुटका करून आईच्या स्वाधीन केलं आहे. गजानन सुपडा पानपाटील असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.


# आई-वडिलांना भेटायला गेला म्हणून पतीला भांडी फेकून मारली

**■ठाणे :** रमजान सणानिमित्ताने आई-वडिलांना भेटायला गेला म्हणून महिलेने पतीला भांडी फेकून मारली. तसेच चाकूने वार केला. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ठाणेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जखमी ३२ व्यक्ती, त्याची ३५ वर्षीय पत्नी, दोन मुले आणि १८ वर्षीय सावत्र मुलासोबत राहतो. त्याच्या पत्नीचा हा दुसरा निकाह आहे. २०२१ मध्ये निकाह झाल्यानंतर तिने पतीवर अनेक निर्बंध लादण्यास सुरुवात केली. त्याला आई-वडिलांना भेटू दिले जात नव्हते. त्यामुळे दोघांमध्ये वारंवार वाद होऊ लागत होते. तसेच त्याला घरामध्ये वेळेवर जेवण देखील मिळत नव्हते.

२८ मार्चला तो त्याच्या लहान मुलाला घेऊन रोजा सोडण्यासाठी आई-वडिलांकडे गेला होता. तो पुन्हा घरी आल्यानंतर त्याच्या पत्नीने या कारणावरून त्याच्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. ३१ मार्चला रमजान ईद निमित्ताने तो आई-वडिलांना पुन्हा भेटण्यासाठी गेला. याबाबतची माहिती त्याच्या पत्नीला मिळाली. तिचा संताप अनावर झाला. रात्री ११.३० वाजता तो घरी आल्यानंतर त्याच्या पत्नीने वाद घालण्यास सुरुवात केली.

आई-वडिलांना भेटला म्हणून पत्नीने आणि १८ वर्षीय सावत्र मुलाने त्याच्या दिशेने स्वयंपाकगृहातील भांडी फेकून मारण्यास सुरुवात केली. त्यामुळे तिघांमध्ये झटापटी झाली. यात त्याच्या पत्नीने स्वयंपाकगृहातील चाकू घेतला आणि त्याच्या हातावर वार केला. या घटनेत तो जखमी झाला. त्याने तात्काळ घटनेची माहिती नातेवाईकांना मोबाईलद्वारे संपर्क साधून दिली. त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर त्याने ठाणेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे ठाणेनगर पोलीस ठाण्यात पत्नी आणि सावत्र मुलावर गुन्हा दाखल झाला आहे.



# मुलानेच केली पित्याची हत्या

**■बदलापूर :** मुलानेच आपल्या पित्याची हत्या केल्याची खळबळजनक घटना बदलापूर शहरात उघडकीस आली आहे. बदलापूर पश्चिमेतील बेलवली भागात सकाळी आठच्या सुमारास ही घटना समोर आली. सुरूवातीला पिता पुत्र संवाद साधत होते. त्यानंतर अचानक पित्याची हत्या झाल्याने खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच बदलापूर पश्चिम पोलिस घटनास्थळी दाखल झाले. नोकरदारांचे शहर असलेल्या बदलापूर शहरात सकाळी नोकरदार, विद्यार्थी यांची लगबग सुरू असतानाच एक धक्कादायक घटना समोर आली. बदलापूर पश्चिमेतील बेलवली भागात हत्या झाल्याच्या बातमीने बदलापुरात खळबळ उडाली. बेलवली हा तसा मराठीबहूल परिसर आहे. रेल्वे स्थानक मार्गावर पवार कॉम्पलेक्सच्या प्रवेशद्वाराजवळच काही दुकाने आहेत. यातील एका दुकानात हा प्रकार घडला. येथे एक बियाणी विक्रेत्याचा व्यवसाय चालतो. हा दुकानाचा गाळा कराळे कुटुंबियांचा असल्याची माहिती मिळते आहे. या दुकानात मालक वडील अनंत कराळे आणि त्यांचा मुलगा गणेश कराळे सकाळी आले होते. सुरूवातीला ते गाळ्याच्या मागच्या बाजूला चर्चा करत होते. मात्र काही काळानंतर गणेश कराळे याने वडिल अनंत कराळे यांच्यावर धारदार शस्त्राने वार केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यात अनंत कराळे यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती आसपासच्या नागरिकांना मिळताच त्यांनी पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळी येत मृतदेह ताब्यात घेतला. मृतदेह पुढील विच्छेदनासाठी बदलापूर पूर्वेतील ग्रामीण उपजिल्हा रूग्णालयात पाठवण्यात आला. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हत्येचे कारण तपासात स्पष्ट होईल असेही पोलिसांनी सांगितले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com